# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 2309 /2023-24 दि. 27/ 12 /2023

विषय :- ठेका कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी करणेबाबत.

परिपत्रक

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर विविध विभागात ठेका पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणेबाबत संबंधित ठेकेदार यांना अवगत करणेबाबत सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापी, अद्यापपर्यंत ठेका कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी झालेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

मनपाच्या विविध विभागांतर्गत कार्यरत ठेका कर्मचारी यांची यादी सोबत जोडून मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय, ठाणे पोलीस आयुक्तालय, मुंबई पोलीस आयुक्तालय, पालघर पोलीस अधिक्षक हद्दीतील/हद्दीच्या बाहेर वास्तव्यास असलेल्या व महानगरपालिकेत ठेका पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी करून मिळणेस संबंधित पोलीस आयुक्तालय यांना विनंती पत्र दिलेले आहे.

तथापी, पोलीस आयुक्तालय कार्यालयातुन फक्त सरकारी कर्मचारी यांचे ऑफलाईन चारीत्र्य पडताळणी केली जात आहे व ठेका कर्मचारी यांना त्यांचे वैयक्तिक अर्ज https://pcs.mahaonline.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पध्दतीने परीपुर्ण माहितीसह सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत, तसेच काही ठेका कर्मचारी यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त होत असल्याबाबत पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय यांनी दि.20/12/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तरी सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना कळविण्यात येते की, ज्या विभागाकडून ठेका कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येते, सदर विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी संबंधित ठेकेदार यांना सुचना देऊन ठेका कर्मचारी यांनी https://pcs.mahaonline.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन चारीत्र्य पडताळणी करणेकरीता अर्ज करण्याचे निर्देश द्यावेत. तसेच ठेका कर्मचारी यांचे एकत्रित चारित्र्य पडताळणी अहवाल आस्थापना विभागात लवकरात लवकर सादर करावेत.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका